# सर्वच डॉक्टरांकडे संशयाने पाहणे चुकीचे

## 'लोकमत'च्या व्यासपीठावर डॉक्टरांची भूमिका; स्त्रीभ्रूणहत्येचा मुद्दा

**पुणे** | दि. २८ (प्रतिनिधी)

'**सध्या** स्त्रीभ्रूणहत्येविषयी सर्वच डॉक्टरांकडे संशयाने पाहिले जाते; परंतु काही डॉक्टर असे चुकीचे काम करीत असतील, तर त्यांच्याबद्दलचा रोष इतरांवर का?' असा सवाल डॉक्टरांनी उपस्थित केला. पेशंट आणि डॉक्टर यांच्यामधील अंतर कमी करण्याचे काम 'लोकमत'ने करावे, असे आवाहन त्यांनी केले. 'दक्षिण पुणे डॉक्टर असोसिएशन' आणि 'लोकमत' यांची नुकतीच सिंहगड रोडवरील 'लोकमत' कार्यालयात बैठक झाली. या वेळी झालेल्या चर्चेत 'लोकमत'चे संपादक विजय बाविस्कर, सहायक महाव्यवस्थापक (वितरण) पुष्कर कुलकर्णी यांच्यासह डॉक्टर संघटनेचे डॉ. मधुसूदन झंवर, डॉ. विजय वारद, दक्षिण पुणे डॉक्टर असोसिएशनचे अध्यक्ष डॉ. राजेंद्र जगताप, डॉ. भाऊसाहेब सोनवणे, डॉ. गिरीश ओंडकर, डॉ. सुनील होनराव, डॉ. दिलीप घुले, डॉ. देवेंद्र शिरोळे (व्हाईस प्रेसिडेंट आयएमए ऑल इंडिया), डॉ. सचिन यादव सहभागी झाले होते.

या वेळी डॉक्टरांनी सांगितले, की लोकांबरोबरच डॉक्टरांनाही प्रबोधनाची गरज आहे. लोकांपर्यंत सकारात्मक विचार पोहोचणे गरजेचे आहे. लोकांना साथीचे आजार, तसेच मानसिक ताण, सामाजिक स्वास्थ्य या विषयांवर सकारात्मक व्यासपीठाची गरज आहे आणि 'लोकमत'ने ते उपलब्ध करून देण्याचे ठरविले ही अतिशय आनंदाची गोष्ट आहे. जे लोक प्रसिद्धीपासून लांब आहेत; परंतु समाजासाठी नेहमी चांगले कामे करीत असतात त्यांना आपण व्यासपीठ उपलब्ध करून द्या. तसेच, आरोग्यविषयक लोकांना उपयोगी पडेल, अशी माहिती आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिद्ध करण्याची विनंतीही त्यांनी केली.

तसेच, देशात अजून इन्शुरन्स कंपन्या सर्वत्र पोहोचू शकलेल्या नाहीत; त्यामुळे गरीब-श्रीमंत ही दरी कमी होण्यासाठी इन्शुरन्सचे महत्त्व लोकांपर्यंत पोहोचविले, तर सामान्य नागरिकांना खूप मोठी मदत होईल, असे मत त्यांनी व्यक्त केले.

### 'लोकमत' चे व्यासपीठ सर्वसामान्यांचे

समाजात लोकांना मदत करणाऱ्या अनेक संस्था कार्यरत आहेत. त्यांचे कार्य लोकांपर्यंत पोहोचण्यासाठी आजपर्यंत 'लोकमत'ने व्यासपीठ दिले आहे. पुढेही हे व्यासपीठ आणखी चांगल्या पद्धतीने सुरू ठेवावे, अशी विनंतीही त्यांनी केली. असे केल्याने सर्व सामान्यांना न्याय मिळेल व चांगल्या संस्थांचा हुरुप वाढेल असा विश्वासही या पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केला.


डॉ. देवेंद्र शिरोळे


डॉ. राजेंद्र जगताप


डॉ. मधुसूदन झंवर


डॉ. विजय वारद


डॉ. भाऊसाहेब सोनावणे


डॉ. गिरीश होनराव


डॉ. सुनील होनराव


डॉ. दिलीप घुले


डॉ. सचिन यादव